# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## कार्यालयीन सुचना क्र. २/२०१३

क्र.संगाबाअवि/१/१०३/२-७२ /२०१३ दिनांक - १८ जानेवारी, २०१३

**विषय - करिअर ॲडव्हांसमेंट योजनेअंतर्गत विद्यापीठ शिक्षकांचे अर्ज मागविण्याबाबत ...**

संदर्भ - १. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निदेश क्र.५/२०११, दिनांक २७/१/२०११
२. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ निदेश क्र.४२/२०११, दिनांक १२/१०/२०११

सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, सहाय्यक ग्रंथपाल, उपग्रंथपाल व सहा.संचालक, शारीरिक शिक्षण व उपसंचालक, शारीरिक शिक्षण यांचेकरिता करिअर ॲडव्हांसमेंट स्कीम अंतर्गत सादर करावयाच्या अर्जाची पध्दती आणि अनुषंगीक अर्जाचे नमुने विहित करण्यात आले आहेत. तद्वतच, संदर्भ क्र.२ वरील निदेशान्वये शिक्षकांच्या CAS अंतर्गत पदोन्नती साठीचे किमान पात्रता व निकष आणि वेतनबॅन्ड व ए.जी.पी./ निवड पध्दती इ. विहित करण्यात आले आहेत.

उपरोक्त दोन्ही निदेश विद्यापीठाच्या संकेत स्थळावर University Publications / Direction या लिंकवर उपलब्ध असून त्यानुसार पात्रताधारक शिक्षकांनी आपले अर्ज विभाग प्रमुखांमार्फत त्यांच्या शिफारसीसह आस्थापना विभागाकडे **निदेश क्र.४२/२०११ मध्ये विहीत करण्यात आलेल्या मुदतीनुसार सादर करावेत. त्यासाठी निदेश क्र.४२/२०११ च्या परिच्छेद ६.०.० च्या उप-परिच्छेद ६.०.१ ते ६.८.० चे अवलोकन करावे.**

अर्ज सादर करतांना खालील सुचनांचे पालन करावे.

१. सहा.प्राध्यापक Stage I ते सहा. प्राध्यापक Stage II साठी - ५ प्रती
सहा.प्राध्यापक Stage II ते सहा. प्राध्यापक Stage III साठी - ५ प्रती
सहा.प्राध्यापक Stage III ते सहयोगी प्राध्यापक साठी - १० प्रती
सहयोगी प्राध्यापक ते प्राध्यापक - १० प्रती
प्राध्यापक ते वरीष्ठ प्राध्यापक - १० प्रतीमध्ये आवेदनपत्र सादर करावीत.

२. विद्यापीठात रुजू होण्यापूर्वीच्या सेवा विचारात घेण्यासाठी संबंधीत शिक्षकांनी निदेश क्र.४२/२०११ च्या परिच्छेद १० नुसार आपली पात्रता तपासून अर्ज करावेत. तसेच अर्जासोबत पूर्वीच्या नियोक्त्यांकडून परिच्छेद १०.१ मधील (a) ते (f) संदर्भात प्रमाणपत्र मागवून ते अर्जासोबत जोडावे. त्यांचे स्वयंमुल्य निर्धारण अहवाल व २००९ नंतरचे API Scores विद्यापीठाकडून मागविण्यात येतील. उपरोक्त बाबींची पूर्तता झाल्यानंतरच त्यांचे अर्ज छाननी समितीसमोर ठेवण्यात येतील.

३. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व्यतिरिक्त इतर विद्यापीठाच्या आचार्य पदवी (Ph.D.) धारकांनी त्यांची आचार्य पदवी (Ph.D.) विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार Enrollment, Course Work and Evaluation सह पूर्ण केली असल्याबाबतचे संबंधीत विद्यापीठाचे प्रमाणपत्र / अधिसूचना प्रत अर्जासोबत जोडावे.

४. या योजनेअंतर्गत अर्ज करणाऱ्या शिक्षकांनी निदेश क्र.४२/२०११ च्या पृष्ठ क्र.४०० वरील Explanatory note for tables II(a) and II(b) चे अवलोकन करावे. तसेच पृष्ठ क्र.४०१ व ४०२ वरील Appendix III च्या Table-III नुसार Minimum Academic Performance Requirement पूर्ण करीत असल्यासच अर्ज सादर करावेत, किंवा सदर निकषांची पूर्तता होईल त्यादिवशी अर्ज सादर करावेत. कॅटेगरी I व II साठी वर्षनिहाय API व category III साठी entire period चे गुणांकन करावे. API प्रपत्रात केलेले गुणांकन तपासण्यासाठी API प्रपत्रानुसार पुराव्यादाखल जोडावयाची सहपत्रे अनुक्रमाने जोडावीत.

५. **सहयोगी प्राध्यापक** - स्टेज-४ साठी अर्ज करणाऱ्या शिक्षकांनी त्यांच्या Bio-data व त्याखाली **'विहीत कालावधीत'** प्रकाशित झालेली फक्त प्रमुख तीन संशोधन प्रकाशने असे चार सेटस् मुल्यांकनासाठी विषय तज्ञांकडे पाठविण्याकरिता अर्जाशिवाय स्वतंत्रपणे सादर करावेत.

६ प्राध्यापक स्टेज-५ साठी अर्ज करणाऱ्या शिक्षकांनी त्यांच्या Bio-data व त्याखाली **'विहीत कालावधीत'** प्रकाशित झालेली फक्त पाच प्रमुख संशोधन प्रकाशने असे चार सेटस मुल्यांकनासाठी विषयतज्ञांकडे पाठविण्याकरिता अर्जाशिवाय स्वतंत्रपणे सादर करावेत. उपरोक्त संशोधन प्रकाशनांची यादी खालील नमुन्यात तयार करून प्रत्येक संचासोबत एक प्रत जोडावी. **या सेट्समध्ये अतिरिक्त प्रकाशने जोडू नयेत.**

## SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

EVALUATION SCORE SHEET FOR THE ASSESSMENT OF QUALITY OF RESEARCH PUBLICATIONS OF THE CANDIDATE FOR APPOINTMENT / PROMOTION TO THE POST OF ASSOCIATE PROFESSOR/ PROFESSOR/ SR.PROFESSOR.

Name of the Candidate - -----------------------------
Subject - -----------------------------
Applied for the post of - -----------------------------

| Sr. No. | Title of the publication | Date / Year of acceptance or publication | Evaluation Score | |
|---|---|---|---|---|
| | | | Out of points | Points obtained |
| | | | 10 | |

७ अर्जासोबत अनावश्यक कागदपत्रे, लेख, अवांतर लेखन, संशोधन प्रकाशने, फोटो, प्रमाणपत्रे, वर्तमानपत्रातील बातम्या, कात्रणे इ. जोडू नयेत.

८ अर्ज व त्यासोबतची सर्व सहपत्रे शक्यतो एकाच Legal किंवा A-4 आकाराच्या कागदावर असावीत. अर्जाची प्रत्येक प्रत कार्यालयीन फाईलमध्ये लावण्याच्या दृष्टीने **पंचिंग मशीनद्वारे** पंच करून लेस अथवा टॅगद्वारे बांधून सादर करावी. स्पायरल बाईंडींग, पुस्तकासारखे बाईंडींग किंवा स्टॅपल्स लावू नयेत.

९. विभागप्रमुखांनी सदर कार्यालयीन सुचना आपल्या अधिनस्थ सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणून त्यांची स्वाक्षरी घ्यावी.

स्वा/
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

प्रतिलिपी माहिती व उचित कार्यवाहीस्तव
१) विभाग प्रमुख, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
२) प्रभारी संचालक, ॲकेडेमिक स्टाफ कॉलेज, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
३) प्र.संचालक, आय.क्यू.ए.सी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
४) संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
५) आस्थापना टेबल क्र.१०१ आणि १०४
६) मा.कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
७) मा.प्र.कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
८) मा. कुलगुरुंचे स्वीय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.
९) कुलसचिवांचे स्वीय सहाय्यक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.